# विठू माझा लेकुरवाळा...

दोन अंकी नाटक

**लेखक: प्रल्हाद जाधव**

पात्र संयोजन :

जनाबाई आंबिले (६० वर्षे)

विठोबा आंबिले (३५ वर्षे)

चंद्रभागा आंबिले (३० वर्षे)

डॉक्टर आय.यू. परदेशी (४० वर्षे)

मेघजी गोहील (५५ वर्षे)

मेघा दुखंडे  (२५)

धापूबाई (५० वर्षे)

विकास पंडित (२५ वर्षे)

विश्वास भोसले- इन्स्पेक्टर (३५ वर्षे)

जयदेव कडू - हवालदार (४० वर्षे)

***

अंक पहिला / प्रवेश पहिला

(पडदा उघडण्यापूर्वी दीड-दोन मिनिटे टाळ मृदुंगांचा गजर. त्यानंतर श्रेयनामावली ऐकू येते. नंतर पुन्हा दहा-पंधरा सेकंदांसाठी टाळ मृदुंगाचा गजर. तो थांबतो आणि हळूहळू पडदा उघडतो. स्थळ : एमजे हॉस्पिटलच्या चौथ्या माळ्यावरील पाच नंबरचा महिलांचा वॉर्ड. प्रसुतीकक्ष. त्याचा सुरूवातीचा भाग रंगमंचावर दिसतो. बाकी संपूर्ण भाग विंगेच्या आत आहे अशी कल्पना. मागच्या मोठ्या खिडकीतून झाडाचे शेंडे, आकाशाचा थोडा भाग दिसतो. खालच्या ट्राफिकचे आवाज अधूनमधून ऐकू येतात. वॉर्डमध्ये दोन खाटा शेजारी शेजारी. प्रत्येक खाटेजवळ मुलांसाठी पाळणे. नातेवाइकांना बसायला एखादे स्टूल. एक आडवे बाकडे. एका कोपऱ्यात नर्सची टेबल खुर्ची. टेबलावर फोनचे एक्स्टेन्शन. पलिकडे दोन खुर्च्या. पडदा उघडतो. चंद्रभागा उशीला टेकून बसलेली. एक दिवस आधी तिने एका बाळाला जन्म दिलेला आहे. स्टुलावर तिची सासू- जनाबाई बसलेल्या. )

जना : बरं वाटतंय ना आता?

चंद्रा :  हो. थोडं गरगरल्यासारखं होतंय इतकंच!

जना : भूल उतरली नाय अजून म्हणून वाटत असेल पण काळजी करू नको... परमेश्वराची कृपा असली की काही कठीण नाय.

चंद्रा : सिझेरियन म्हटल्यावर मी इतकी घाबरली होते की काही विचारू नका...

जना : उशिरा बाळंतपण म्हटलं की ऑपरेशनचा धोका असतोच पण पार पडलं एकदाचं देवाच्या कृपेनं... आणि एकदा का बाळाचं तोंड बघितलं की काय लक्षात रहातंय मग? उशी देऊ का टेकायला आणखी एक?

चंद्रा : नको सासूबाई.

जना : माझी फार वर्षापासूनची विच्छा होती की घरात पाळणा हलावा...

चंद्रा : मग झाली ना ती पूर्ण आता?

जना : झाली एकदाची पूर्ण... परमेश्वराचे उपकार कसे फेडावे ते कळत नाय... विठूचा बाप असता तर किती आनंद झाला असता त्याला, गावभर पेढे वाटले असते. बारसं असं थाटात केलं असतं की ज्याचं नाव ते! मला तर असं वाटतंय चंद्रभागे–

चंद्रा : काय?

जना : विठूचा बापच आलाय तुझ्या पोटाला! तेच रूप, तसाच रंग...

चंद्रा  : बरं बरं आता जास्त कौतुक करू नका नायतर दृष्ट लागायची त्याला!

जना : काय बोलू नि काय नको असं झालंय. आणि लागली दृष्ट तर मी हाय की उतरायला...

चंद्रा : (विषय बदलत) गाडी मिळाली का आईला?

जना : विठू आल्यावर समजल आता. थांबल्या असत्या सखूबाई आणखी चार दिस तर आनंद वाटला असता...

चंद्रा : तुम्हाला माहिताय आमच्या गावची परिस्थिती... एकट्या आईच्या जीवावर चाललंय सगळं... माणसं सोडाच पण घरातल्या जनावरांनासुद्धा तिचाच लळा आहे. आई दिसली नाय तर पाण्याला पण तोंड लावत नाहीत ती. दोन दिवस थांबली हेच खूप झालं...

जना : खरं हाय तुझं म्हणनं, त्याना गाडीत बसवूनच विठू इकडं येणार होता... ( बाहेरून वॉर्डबॉय मेघजी सोळंकी हातात एक बादली आणि मोठ्या दांडीचा पिळा घेऊन येतो. बादलीत बुडवून पोछा मारू लागतो. पन्नाशी उलटलेला बेरकी वॉर्डबॉय.)

मेघजी : (तोंडात पान. जनाबाईना- ) पॉय वर घ्या!

जना : (गोंधळून) काय म्हणालास?

मेघजी : पॉय वर घ्या... पोछा मारू दे मला...

जना : असं व्हय? (पाय वर घेत) जरा दमानं घे बाबा. काठी लागली पाळण्याला तर बाळ उठल, झोपलंय आताच!

मेघजी : (अपमानित झाल्याप्रमाणे) टुमी मला शिकवटा?

जना : काय?

मेघजी : टुमी मला शिकवटा?

जना : तुझं ते तोंड मोकळं करून ये आधी, मला काहीच कळत नाय...

मेघजी : (खिडकीजवळ जाऊन बाहेर पिचकारी मारतो आणि परत येऊन तावातावाने) पोराच्या पाळण्याला दांडा लागंल हे मला शिकवताय तुमी? मला अक्कल नाय, मी गाढव हाय असं वाटलं का तुमाला?

जना : मी कुठं तुला गाढव म्हणाले? ( चंद्रभागाला हळूच ) वास काय येतोय मेल्याच्या तोंडाला बघ... पिऊन आलाय वाटतं. शीऽऽऽ

मेघजी : काय म्हणाला, पिऊन आलाय? हो पिऊन आलोय मी पण स्वतःच्या पैशानं! तुमी दिली का आणून?

जना : अरे पण त्याला काय काळ वेळ?

मेघजी : हे स्टूल घ्या तिकडं... चाळीस वर्ष नोकरी झाली माझी पण 'घेतली' नाय असा एक दिवस गेला नाय... का ते तुमाला कळणार नाय... आता सकाळी चारचीच गोष्ट घ्या–

जना : काय झालं चार वाजता?

मेघजी : शेजारच्या चार नंबरच्या वॉर्डातली नऊ नंबरची पेशंट बाई... खैरुन्निसा इक्बाल हुसेन...

जना : काय झालं तिला?

मेघजी : काय होणार, गचकली की!

जना : आँ?

मेघजी : आता मरायचं तर सकाळी उजाडल्यावर नायतर दुपारी नाय मरायचं?

जना : नको बाबा कायतरी अभद्र बोलू असं, पोर झोपलंय माझं सोन्यासारखं...

मेघजी : आता काय अभद्र हाय त्यात? जन्माला आल्यालं माणूस मेल्याशिवाय ऱ्हातंय का?

जना : आरं पण बाळंतपणाला आलेली बाई म्हजी तरणी असणार... अशात मरण यावं म्हजी वाईट नाय का?

मेघजी : नवऱ्याचा पत्ता नाय का गावाचा पत्ता नाय. नशीब, नाव तरी व्हतं केसपेपरवर नायतर हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन का आणखी कोणत्या धर्माची ते पण कळलं नसतं. मेली ती मेली पोरगं मागं ठेवून गेली!

जना : पोरगं, म्हणजे?

मेघजी  : पोरगं हाय चार दिवसाचं तिला... (हलकं संगीत)

जना : विठ्ठला, पांडुरंगा... काय रे तुझा खेळ हा!

मेघजी : आता सांगा, रोज हॉस्पिटलात इठ्ठलाचा असा हा खेळ बघायला मिळाला त माणसाचं टाळकं जागेवर ऱ्हाईल का? त्यामुळं नवटाक-पावशेर मारल्याशिवाय दिवटी सुरूच होत नाय मपली!

जना : चार दिसाचं बाळ म्हणजे काय होणार रे बाबा त्याचं आता? कोण बघणार त्याच्याकडं?

मेघजी : काय नाय होत, तुमी काळजी करू नका. जिसने जनम दिया है वही सबकुछ देखता है... ('तेही खरं बाबा अशी प्रतिक्रिया जनाबाई देतात. त्याचे पोछा मारणे सुरूच. थोडं थांबून) तुमचा मुलगा आला नाय अजून?

जना : येईल आता, का?

मेघजी : इठ्ठल नाव ना त्याचं?

जना : व्हय. गुणाचा हाय पोरगा माझा. मुलगा झाल्यापास्नं नाचतोय नुस्ता...

मेघजी : (एक बोट दाखवत) 'एक गांधी' घेतल्याशिवाय सोडणार न्हाय त्याला.

जना : एक गांधी?

मेघजी : एक गांधी म्हंजी शंभराची एक नोट. पहिला मुलगा झाला की एक गांधी घेतो आमी. त्यातबी दोन वाटे होत्यात. मी आनं धापूबाय...

(सिस्टर येते. तिच्या हातात औषधांचा ट्रे)

जना : नमस्कार सिस्टरताई.

सिस्टर : (हसत) नमस्कार. कशी आहे बाळ - बाळंतीण?

जना : अगदी आनंदात आहेत बगा सिस्टरताई. हा सोन्याचा दिस दिसावा म्हणूनच डोळे उघडे ठेवले होते विठ्ठलानं...

आता मरायला मोकळी झाल्ये!

सिस्टर : मरायला कशाला? नातवाचं तोंड बघितलं पण त्याचं लग्न झालेलं बघायचं नाही का? ( सारे हसतात. सिस्टर औषधांचा ट्रे टेबलावर ठेवते. केसपेपर वरील काही नोंदी पहाते आणि मग खाटेजवळ येऊन दोन गोळ्या चंद्राला देते.) ही घे. ( चंद्रभागा गोळी घेते. सिस्टर दुसरी गोळी देते.) ही घे. (चंद्रभागा दुसरी गोळी घेते. मग सिस्टर इंजेक्शन भरू लागते.)

जना : कधी सोडताय आम्हाला इथनं?

सिस्टर : पाच सहा दिवस रहावं लागेल अजून. त्यानंतर सोडतील डॉक्टर असं दिसतंय... (दंडावर इंजेक्शन देते) एक मिनीट हं... झालं, झालं!. गूड... आंघोळ घातली का बाळाला?

जना : व्हय घातली की. अगदी चांगलं गुरगटून झोपलंय सोनं माझं. कधी एकदा घरी घेऊन जातोय असं झालंय... डॉक्टरना सांगून तेवढं लवकर सोडा आम्हाला घरी...

सिस्टर : काय एवढी घाई आहे?

जना : विठूचं लग्न होऊन बारा वर्ष झाली सिस्टरताई, पण मूल होत नव्हतं... इतके नवस केले की देव शिल्लक ठेवला नाय पण दया आली शेवटी परमेश्वराला... बारसं चांगलं थाटामाटात करायचंय... तुमी या बरं का बारशाला सिस्टरताई.

सिस्टर : (हसत) अहो तुम्ही मला सिस्टरताई, सिस्टरताई काय म्हणताय? सिस्टर म्हणजेच ताई.

जना : असं व्हय? आम्हाला काय कळतंय त्यातलं अडाणी माणसाना? आमच्यासाठी तुम्ही सिस्टरताईच. आठवणीनं या बरं का... खणा-नारळानं वटी भरल्याशिवाय बरं नाही वाटायचं माझ्या जीवाला...

सिस्टर : बरं बरं, येईन. कुठं राहता तुम्ही?

जना : भायखळ्याला. आण्णा पाटील चाळ हाय ना... तिथं. कुणालाही विचारा, विठ्ठल आंबिले कुठं राहतात म्हणून विठ्ठल नाव ध्यानात नाय न्हायलं तर विचारायचं, 'भाजीवाली आंबिलेमावशी कुठं राहते... शेंबडं पोरपण आणून सोडतंय बघा...

सिस्टर : (हसत) बरं... बरं... एवढा आग्रह आहे तुमचा तर नक्की येईन. पण असं प्रत्येकाच्या घरी जायचं ठरलं तर खणा-नारळाचं दुकान टाकावं लागेल मला... रोज दहा-वीस बाळंतपणं होतात आमच्याकडं (सर्व हसतात.)

जना : लग्न झालंय का तुमचं?

सिस्टर : ठरलंय आत्ताच, पण तुम्ही काळजी करू नका; नाहीतर मुलगा शोधायला सुरूवात कराल लगेच! (तिघेही हसतात. बाहेरून विठोबा येताना दिसतो)

जना : आला वाटतं विठू, ( विठोबा येतो. वयाची पस्तीशी गाठलेला काळासावळा, हसतमुख तरुण, कपाळावर त्रिपुटी गंध, गळ्यात तुळशीची माळ, एका हातात पिशवी.) (आईला वाकून नमस्कार करत) कसं हाय बाळ?

जना : छान हाय, काळजी करू नगं तू. मिळाली गाडी सखुबाईंना?

विठू : हो. रिकामी होती अगदी. बसायला खिडकीजवळची जागा मिळाली...

जना : चला, बरं झालं... सखुबाई होत्या मदतीला म्हणून बरं झालं, मला एकटीला काय झेपलं नसतं हे सगळं.

विठू : इकडं तुझ्या मदतीला आई होती हिची आणि तिकडं माझ्या मदतीला शेजारची सोनी मावशी. ती नसती तर उपाशी मरावं लागलं असतं मला.

चंद्रा : हे मात्र खरं. मला ॲडमिट करतानापण चांगलीच धावपळ केली तिनं. (कुतुहलानं) काय आणलंय डब्यात?

विठू : तुपाचा शिरा आणलाय. (चंद्रभागा आणि जनाबाई दोघीही हसतात)

जना : तुला साधा स्टो पेटवता येत नाय, का च्या करायची माहिती नाय अन तू कसा काय एकदम शिरा केलास?

विठू : मुलाचा पायगुण, दुसरं काय? मुलगा झाल्यामुळं इतकी ताकद आलीय अंगात की आकाशातले तारे तोडून आणायला सांग तू, आत्ता आणतो. (थांबून खरं सांगत ) शेजारची सोनीमावशी आली होती मदतीला...

जना : तरी मला वाटलंच होतं... आकाशातले तारे तोडायला पण तिलाच घेऊन जा सोबत म्हणजे झालं. (तिघेही हसतात) देव करो आणि अशी शेजारीण सर्वांना मिळो...

विठू : (पिशवीतून डबा बाहेर काढत ) गरम गरम खाऊन घ्या तुम्ही, तोवर मी जरा बाळाला घेतो. कधी एकदा घरी घेऊन जातोय असं झालंय, आज विचार तू आई डॉक्टरांना डिस्चार्जचं. ( डबा ठेवून पाळण्याजवळ जातो. जाळी उचलून आत पाहतो तर आत बाळ नाही) बाळ कुठाय?

जना : काय म्हणालास?

विठू : नाही, बाळ कुठाय, पाळण्यात नाही बाळ...

जना : काय, पाळण्यात बाळ नाही?

विठू : मग मी काय खोटं बोलतोय का? (पुन्हा पाहात) पाळणा तर रिकामा हाय.

जना : अरे काय बोलतोयस तू? मीच माझ्या हातानं निजवलंय त्याला पाळण्यात.

विठू : पण पाळणा तर रिकामा हाय... ( ' असं कसं होईल' असं म्हणत जनाबाई उठून धावत पाळण्याकडं जातात आणि आत पाहात)

जना : अगं बया, पोर दिसत नाय पाळण्यात.

चंद्रा : (छातीवर हात ठेवंत) अहो, मग गेलं तरी कुठं?

जना : आंघोळ घालून माझ्या हातात दिलं धापूबायनं आनं मीच झोपवलं होतं त्याला इथं...

चंद्रा : अरे माझ्या कर्मा, काय झालं म्हणायचं हे, कुठं गेलं, माझं बाळ? सिस्टर, अवो सिस्टरऽऽऽ

सिस्टर : (रजिस्टर चाळत शांतपणे) काय झालं?

चंद्रा : अहो, बाळ नाही पाळण्यात.

सिस्टर : बाळ नाही, मग गेलं कुठं? ( जनाबाईना ) तुम्ही तर आत्ताच म्हणालात की झोपलंय म्हणून...

चंद्रा : (तिचा धीर सुटतो) आता काय म्हणावं या कर्माला? धावा सिस्टरताई, बघा बाळ कुठं कुणी नेलं असंल तर... धावा लवकर... (मेघजी उरलेल्या भागात पोछा मारून पान चघळत आरामात परत येतो)

मेघजी : काय झालं हो?

चंद्रा : पाळण्यात बाळ नाय.

मेघजी : मग त्यात एवढं बोंबलायला काय झालं इतकं? आंघुळीला नेलं असंल धापूबायनं...

जना : अरे बाबा, आंघोळ तर पहाटेच झाली त्याची.

मेघजी : मग नेलं असंल दुसरं कुठं चेकिंगला.

जना : पण चेकिंग वगैरे काहीच नव्हती त्याची...

सिस्टर : ( जनाबाईना ) कोवळं उन्ह दाखवण्यासाठी बाहेर नेलंय का कुणी तुमच्या नातेवाईकांनी?

जना : ( रडत) नाय गं माजे बाये... आता कितीवेळ सांगू तुला? एक बी नातेवाईक आलेला नाय हितं आमचा. विठूची सासू आली होती ती रात्री घरीच होती मुक्कामाला.

सिस्टर : मग काय झालं, दुसरं कुणी आलं होतं का इथं?

जना : कुणीसुद्धा आलं नाय. आता आमी बसूनंच नाय का इथं रात्रभर? सकाळी मी फक्त तोंड धुवायला उठली होती पाच मिन्टासाठी तेवढंच... काय करावं ह्या कर्माला आता!

चंद्रा : ( गळा काढत ) टाके दुखत होते म्हणून रात्रभर मला झोप नाय, सकाळी जरा डोळा लागला इतकंच... नायतर माझं पण लक्ष होतं सारखं बाळावर...

विठू : (चिडत मेघजीला) अरे तुमचं एवढं मोठं हॉस्पिटल हाय पण तुम्हाला साधं मुलांवर लक्ष ठेवता येत नाही काय? आम्ही कुठं शोधावं त्याला? इथली काही माहितीपण नाय आम्हाला... कशाला नोकऱ्या करता तुमी?

मेघजी : इतक्या बाया बाळंत व्हतात हितं... कुठं कुठं लक्ष ठिवायचं? आन् आपल्या पोरावर आपन लक्ष ठेवाय नको? पोर कुणाचं, तुमचं हाय ना का आमचं? ( त्यांच्या या गोंधळातच डॉ. परदेशी येतात. हसतमुख, प्रसन्न व्यक्तिमत्व. " डॉक्टरसाहेब आले, डॉक्टरसाहेब आले " असं म्हणत सिस्टर त्यांना रस्ता करून देते.)

डॉक्टर : काय रे काय झालं? गडबड कसली चाललीय?

सिस्टर : साहेब यांचं बाळ–

डॉक्टर : काय झालं बाळाला? आणि ही रडते का अशी?

सिस्टर : यांचं बाळ दिसत नाही सर.

डॉक्टर : बाळ दिसत नाही, व्हॉट डू यू मीन?

सिस्टर : हो सर, पाळण्यात बाळ नाही.

डॉक्टर : काय प्रकार आहे हा, काय म्हणतेय ही?

मेघजी :  हो साहेब.

डॉक्टर : (जनाबाईंना) तुम्ही होता ना इथं? काय करत होता तुम्ही? (मेघजीला) मेघजीऽऽऽ

मेघजी : मी त्येच सांगतोय साहेब, आपल्या मुलावर आपण लक्ष ठेवायला नको का?

डॉक्टर : अरे पण आपल्या ताब्यात आहे ते तोवर आपली जबाबदारी नाही का? जरा बघून ये वॉर्डात, धापूबाईला विचार, ती होती ना रात्री ड्युटीवर? जा लवकर.

मेघजी : जी साहेब. ( बाहेर जातो. चंद्रभागेचं रडणं सुरू)

डॉक्टर : रडू नका तुम्ही काळजी करण्यासारखं काही नाही त्यात. सापडेल बेबी, असेल इथंच कुठंतरी. (डॉक्टरांचा मोबाईल वाजतो. ते मोबाईलवर नंबर पहातात. फोन त्यांच्या बायकोचा) हॅलो... हां... बोल... मी वाटच बघत होतो तुझ्या फोनची... कार्यक्रम ठरला? अच्छा, आय सी... आय सी ... मुलांना पिक्चरलाच जायचंय ? ओके... ओके... एस्सेल वर्ल्डचं कॅन्सल करू मग आणि पिक्चर संपल्यावर शॉपिंगला जाऊ ! ओके... ओके... आलं लक्षात.

विठू : ( त्यांना मध्येच थांबवत ) काय चाललंय काय डॉक्टरसाहेब तुमचं हे? आमचं बाळ हरवलंय आणि तुम्ही इकडं सिनेमाच्या गप्पा करताय? पोलिस कंप्लेट तरी करा आधी...

डॉक्टर : ( फोनवर हात ठेऊन) हे बघा, मला माहिताय तुमचा प्रॉब्लेम... जरा थांबा की थोडा वेळ ! ( सिस्टरला ) जरा पोलिसांना फोन लाव. ( फोनवर ) यू गो अहेड विथ यूवर प्रोग्रॅम, आय विल जॉइन यू लेटर ऑन. तिकिटं? ओके ओके. मी खंडेलवालशी बोलतो, पाठवून देईल तो घरी... ओके? बाऽऽऽ य... ( विठूला) सांगितलं ना तुम्हाला काही काळजी करू नका म्हणून.. सापडेल बाळ. एव्हरीथिंग विल बी ऑलराईट. तुम्हाला जशी बाळाची काळजी वाटते तशी आम्हाला नाही का वाटत? उगाच पॅनिकी होण्यात काही अर्थ आहे?

सिस्टर : (फोन देत) सर, इन्स्पेक्टर भोसले आहेत फोनवर.

डॉक्टर : हॅलो, नमस्कार भोसलेसाहेब, डॉक्टर परदेशी बोलतोय मी. नाही तसं काही विशेष नाही, वॉर्ड नंबर चारमधनं एक बेबी मिसिंग आहे, तुम्ही पहा जरा तुमच्या पद्धतीनं... माझी काय मदत हवी असली तर जरूर सांगा, ओके? पूर्वी चव्हाण होते तुमच्या जागी, कुठं गेले ते? मालाडला? आय सी... ओके... चांगले मित्र होते आमचे, काय लागलं रात्री बेरात्री तर कळवत चला, ओके? थँक्यू !  (फोन ठेवत सिस्टरला ) इन्स्पेक्टर भोसले येताहेत. त्यांना काय हवी ती माहिती द्या. मी अय्यंगार मॅडमच्या कानावर घालून येतो तोपर्यंत. (मेघजी येतो.  बाहेर जाता जाता मेघजीला) काय रे सापडतंय का?

मेघजी : सगळा वॉर्ड बघून आलो साहेब,दिसत नाही कुठं.

डॉक्टर : तुम्ही लोक एक दिवस सगळी इज्जत घालवणार हॉस्पिटलची आणि आम्हाला फासावर चढवणार असं वाटायला लागलंय आता...

मेघजी : पण साहेब... मी काय... आमचा त्यात काय...

डॉक्टर : पोलिस येताहेत, त्यांना सांग काय सांगायचं ते.  (निघून जातात. चंद्रभागा एकदम उमाळ्यानं 'माझं बाळ' असं म्हणून रडू लागते)

जना : अगं गप रहा, ओली बाळतीण हाईस तू. त्रास करून घेऊ नको. आधीच मोठं आपरेशन झालंय तुझ... (चंद्रा आणखीनंच मोठ्यानं रडू लागते.) गप, गप माझी बाय ती! तू बघत काय ऱ्हायलास विठू, जरा हातपाय हलंव की! बघ जरा नक्की काय झालंय ते!

विठू : पण काय करू तेच कळत नाय मला. हातापायातनं वारं गेल्यासारखं झालंय... (चंद्रा गळा काढते)

मेघजी : अवो, कशाला आरडाओरडा करताय? सांगितलं ना एकदा डॉक्टरानी बाळ मिळंल म्हणून?

विठू : ( चिडत) मिळणार म्हणजे काय आमच्यावर उपकार करणार काय तुमी? हे काय हॉस्पिटल आहे का धर्मशाळा?

मेघजी : हे बगा, आरडा ओरडा करून काहीही फायदा होणार नाय. माझ्यावर भरवसा ठेवा तुमी. बाळ मिळंल, आमचा अनुभव हाय तसा.

विठू : अनुभव?

मेघजी : ( तंबाखू मळत, गोष्ट सांगत असल्याच्या आविर्भावात ) आता बघा, मार्ग एकदा असंच झालं होतं...

विठू : असंच झालं होतं? काय झालं होतं?

मेघजी : म्हजे बघा... मी हा असाच सकाळी सकाळी दिवटीवर होतो. आणि अगदी असंच सकाळच्या पारी एक बाळ नाहीसं झालं...

विठू : म्हजे?

मेघजी : म्हजे अगदी अशीच शेम टू शेम केस... बाळ बेपत्या झालं, मग डॉक्टर आले आन मला म्हणाले बघ जरा कुठं दिसतंय का... मी बाहेर पडलो... तर पयल्यांदा कुठं गेलो असन सांगा?

विठू : गेला असशील पानाच्या दुकानावर, नाहीतर दारूच्या अड्डयावर ...

मेघजी : (पॅन्टचा खिसा चाचपत) त्याची काय गरज नाय, स्टॉक खिशातच असतो आपला... तर मी बाहेर पडलो आणि पयल्यांदा गेलो तो बाहेरच्या आमच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर... अन बघतो तर काय?

विठू : काय?

मेघजी : तर बाळ असं कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर पडलेलं...

विठू : कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर?

मेघजी : (रस घेत) अन तुम्हाला गंमत सांगतो...

जना : काय पिक्चरची स्टोरी सांगतोयस का रंगवून रंगवून? माणूस हायेस का हैवान मेल्या?

मेघजी : आता त्यात काय आपण मनाचं सांगतोय काय? पिक्चरची स्टोरी झक मारील ह्या स्टोरीपुढं... तर मी हा असा बाळाला बघतोय तर इकडनं दोन डुकरं आणि तिकडनं दोन कुत्रे... काय?

विठू : (तिरकस ) इकडनं दोन डुकरं अन् तिकडनं दोन कुत्रे!

मेघजी : अगदी बरोबर... अन ते आता झडप घालून बाळाचे लचके तोडणार इतक्यात मी पटकन पुढं झालो बाळ उचललं आणि असं छातीशी धरलं... (तंबाखू तोंडात टाकत ॲक्शन करून दाखवतो.)

विठू : मग राष्ट्रपती पदक मिळालं असंल तुला!

मेघजी : राष्ट्रपती पदक घेऊन काय चाटायचंय? पाच गांधीजी दिले त्या पार्टीनं...

विठू : पाच गांधीजी?

मेघजी : पाच गांधीजी म्हणजे शंभराच्या पाच नोटा... बक्षीस दिल्या मुलाच्या बापानं.

विठू : एक दमडी देणार नाय मी तुला. पगार मिळतो ना तुम्हाला महिन्याच्या महिन्याला? आणि बाहेर पाटी लिहिलीय 'कुणालाही लाच देऊ नये' म्हणून ती कशासाठी? आम्हाला असं भीक मागायला शिकवलेलं नाय आमच्या आईबापानं. (मेघजीच्या दंडाला धरून खेचत ) चल दाखव मला तुमचा तो कचऱ्याचा ढिगारा कुठाय ते!

( 'हे बघा, अंगला हात लावायचं काम नाय ' असं म्हणत मेघजी स्वतःला सोडवून घेतोय, तोवर इन्स्पेक्टर भोसले आणि हवालदार कडू ताडताड येतात.)

विठू : अगदी देवासारखे आलात बघा इन्स्पेक्टरसाहेब. बाळ हरवलं आमचं इथनं आणि इथं कुणालाच त्याचं काय सोयरसुतक नाय. आणि हा मेघजी वर आम्हाला मुलं हरवल्याच्या गोष्टी रंगवून रंगवून सांगतोय. (हात जोडत ) आम्हाला आमचं बाळ मिळवून द्या साहेब. पाय धरतो मी तुमचे वाटल्यास. (विठू भोसलेंचे पाय पकडतो. ते त्याला 'अरे अरे' करत वर उठवतात.)

जना : काय आक्रीत झालं ते कळंना साहेब... आत्ता होतं इथं आन डोळ्यादेखत एकदम कसं नाहीसं झालं काहीच लक्षात येत नाही बघा. (चंद्रा गळा काढते तिला त्या शांत करू लागतात.)

भोसले : (विठूला) नाव काय तुझं?

विठू : विठोबा नरहरी आंबिले.

भोसले : वय?

विठू : पस्तीस वर्षे.

भोसले : पत्ता?

विठू : अण्णा पाटील चाळ, भायखळा.

भोसले : व्यवसाय?

विठू : भाजी विक्री... मंडईत गाळा हाय आमचा...

जना : ह्या काय रिकाम्या चौकशा करत बसलाय साहेब... बाळाला शोधा की आधी...

भोसले : आपण कोण?

जना : मी आय हाय याची.

भोसले : आणि (चंद्राकडे पहात) मूल हरवलं त्याची आई?

जना : बरोबर. चंद्रभागा नाव आहे तिचं साहेब.

चंद्रा : ( गळा काढत ) साहेब माझं बाळ, माझ्या काळजाचा तुकडा... त्याला शोधून काढा आधी, माझा जीव जाईल नायतं...

भोसले : ओके... ओके. हे बघा काही काळजी करू नका. कुठं सप्त पाताळात लपवलं असलं तरी शोधून काढू त्याला आपण असे प्रकार इथं घडू नयेत यासाठी तर हॉस्पिटलच्या आवारात पोलिस चौकी सुरू केलीय आम्ही! कडूऽऽऽ

कडू : यस सर!

भोसले : जरा बघ बरं कुठं दिसतंय का ते!

मेघजी : (स्वतःच) आत्ताच फिरून आलो साहेब मी वॉर्डात, पण एकसुद्धा पडलेलं दिसलं नाही कुठं.

भोसले : पडलेलं? तुला काही लाज शरम? वाटेवर पडायला मुलं म्हणजे काय पालापाचोळा वाटला का काय तुला?

मेघजी : माफी करा साहेब. आदत पडलीय त्यामुळं...

भोसले : ओके. ( कडूला) चल पळ... लाग तुझ्या कामाला. जाताना वॉर्डाचा दरवाजा बंद करून घे. मेनगेट पण बंद करून घे लौकर. दळवीला बोलावून घे मदतीला. त्याला म्हणाव इथं बाळंत झालेल्या प्रत्येक बाईचा पाळणा तपासायचा. एखाद्या पाळण्यात दोन बाळं दिसली किंवा कुठं काही संशयास्पद आढळलं तर लगेच बोलवायचं मला... हॉस्पिटलच्या परिसरातच असेल कुठंतरी असं वाटतंय मला. (दमात घेत) आणि रिझल्ट पाहिजे मला हे लक्षात ठेव... (कडू 'यस सर' असं म्हणत सलाम ठोकून आत पळतो. भोसले सिस्टरकडे मोर्चा वळवतात) रात्री तुम्ही होतात ड्युटीवर?

सिस्टर : हो साहेब.

भोसले : इन्चार्ज डॉक्टर कोण आहेत इथले?

सिस्टर : डॉक्टर परदेशी.

भोसले : हां, म्हणजे आत्ता माझ्याशी फोनवरनं बोलले ते...

सिस्टर : बरोबर.

भोसले : कुठाहेत ते? बोलवा त्यांना!

सिस्टर : डीनच्या कानावर हा प्रकार घालायला गेले साहेब ते. मी बोलवतेच त्यांना.

भोसले : डीन कोण आहेत आता मिसेस अय्यंगार ना?

सिस्टर : हो!

भोसले : किती महिन्यापासून आहेत त्या इथं?

सिस्टर : सहा महिने झाले असतील.

भोसले : ओके-ओके! तुमचं नाव काय?

सिस्टर : शोभा दुखंडे...

भोसले : किती वर्षे सर्व्हीस झाली तुमची?

सिस्टर : सात वर्षे.

भोसले : यापूर्वी किती मुलं चोरीला गेली इथनं?

सिस्टर : तसं काही आठवत नाही साहेब... मी नवीनच आहे या सेक्शनला...

भोसले : आठवण्याचा प्रयत्न करा.आठवेल आपोआप.

मेघजी : ( पुन्हा मध्येच बोलत) साहेब माझी चाळीस वर्षे सर्व्हीस झाली इथं. मुलं चोरीला जाण्याचे प्रकार हे आत्ता... गेल्या दोन-तीन वर्षापासनं सुरू झालेत. पूर्वी होत नव्हतं असं कधी...

भोसले : तुझं नाव?

मेघजी : मेघजी सोळंकी. मूळचा राजस्थानचा हाय मी, पण मुंबईतच हाय मी जन्मापासून.

भोसले : कुठं राहतोस?

मेघजी : इथंच मागं सर्व्हेंट क्वॉटरमध्ये राहतो साहेब...

भोसले : रात्री तू होतास इथं ड्युटीवर?

मेघजी : हो.

भोसले : आणखी कोण कोण होतं तुझ्यासोबत?

मेघजी : ह्या सिस्टर, अन धापूबाय...

भोसले : ही धापूबाय कोण?

सिस्टर : आया आहे ती साहेब...

सिस्टर : बाळाला आंघोळ घालून ती निघून गेली. ड्यूटी संपते तिची...

भोसले : (दमात घेत सिस्टरला) किती वाजता आंघोळ घातली तिनं बाळाला? पटापट बोला, फुकट घालवायला वेळ नाही माझ्याकडं आणि खोटं बोललात तर याद राखून ठेवा, खडी फोडायला पाठवीन एकेकाला!

सिस्टर : साडेसहा वाजता धापूबाईनं आंघोळ घालून बाळाला जनाबाईकडं दिलं... त्यांनी स्वतःच्या हातानी पाळण्यात घातलं त्याला आणि त्या बाथरूमला गेल्या. विचारा त्यांना...

जना : (काही सांगू पाहतात) आता म्हजी बघा साहेब... म्हजी मी–

भोसले : ( त्यांना अडवत ) मी विचारल्याशिवाय बोलायचं नाही कुणी!

भोसले : (सिस्टरला) चंद्रभागा काय करत होती तेव्हा?

सिस्टर : ती झोपली होती.

चंद्रा : हो साहेब, माझा डोळा लागला होता, थोडा वेळ माझा...

भोसले : जनाबाई परत कधी आल्या?

जना : मी चूळ भरून तशीच माघारी आले.

भोसले : तुम्ही कुणी बोलू नका मध्येमध्ये सांगितलं ना एकदा? (सिस्टरला ) बोला, जनाबाई कधी परत आल्या?

सिस्टर : साधारणपणे पावणेसात वाजता, म्हणजे पंधरा मिनिटांनी परत आल्या त्या!

भोसले : तुम्हाला वेळ अचूक कशी काय माहीत?

सिस्टर : कारण रोज सकाळी पावणेसात वाजता मी स्टोअरमधनं औषधं आणि गोळ्या घेऊन येते... त्याच वेळी पेशंटसाठी दुधाची ट्रॉली येते. मी औषधं घेऊन आले तेव्हा जनामावशी बाथरूममधनं बाहेर पडताना दिसल्या... आणि दुधाची ट्रॉलीपण आली...

भोसले : याचा अर्थ बाळ साडेसहा ते पावणेसात या पंधरा मिनिटात नाहीसं झालं, बरोबर?

भोसले : ओके... म्हणजे साडेसहा ते पावणेसात या वेळात वॉर्डात कोणीही नव्हतं... तुम्ही पावणेसातला परत आलात त्यानंतर काय झालं हे आठवतं?

सिस्टर : मी औषधं घेऊन आले. रजिस्टर भरलं, सर्वांना गोळ्या-औषधं दिली...

भोसले : यावेळी वॉर्डात दुसरं कोणीही नव्हतं?

सिस्टर : (गप्प)

भोसले : बोला...

सिस्टर : (गप्पच)

भोसले : धापूबाय कुठं होती तेव्हा... आठवतं?

सिस्टर : काही आठवत नाही आता...

भोसले : या दरम्यान तुम्ही नुसत्या खुर्चीत बसून होतात? कुणी माणसं? फोन?

सिस्टर : हो आठवलं...

भोसले : काय आठवलं? बोला पटापट...

सिस्टर : मी औषधं घेऊन आले तेव्हा एक फोन आला होता.

भोसले : कुणाचा फोन?

सिस्टर : खंडेलवाल म्हणून साहेबांचा मित्र आहे, त्याचा फोन होता तो. धापूबाईची चौकशी करीत होता.

भोसले : आय सी ... एक मिनिट (खिशातून नोटबूक काढून टिपून घेत) काय नाव म्हणालात त्याचं?

सिस्टर : खंडेलवाल.

भोसले : ओके, खंडेलवाल! हा सोळंकी कुठं होता तेव्हा?

मेघजी : ( स्वतःच उत्साहाने ) चार नंबरमधली पेशंटबाई वारली, खेरुन्निसा नावाची. तिची बॉडी घेऊन पोष्ट मार्टमला गेलो व्हतो मी तवा ... चार दिवसाचं पोर हाय तिला आन् एक नातेवाईक हजर नाय साहेब... आमी तरी कसं काम करावं सांगा तुमीच ! ( एकदम एका अर्भकाच्या रडण्याचा विंगेतून आवाज ऐकू येतो. सर्वांचे चेहरे उजळतात. चंद्रा आणि जनाबाई एकदम उठून उभ्या रहात 'सापडलं वाटतं बाळ' असं म्हणत अधिर होऊन विंगेकडं पहातात. हवालदार कडू दुपट्यात गुंडाळलेलं एक बाळ घेऊन आत येतो. जनाबाई धावत जाऊन बाळ हातात घेतात 'माझा सोन्या तो, माझा छकुला तो करत त्याला छातीशी लावतात. आणि पटापट त्याचे मुके घेतात मग बाळ घेऊन त्या चंद्राच्या जवळ जातात, तिच्याजवळ देतात. तीही त्याचे मुके घेते आणि आपल्या छातीशी लावते. संगीत)

भोसले : ( कडूला) कुठं सापडलं?

कडू : साहेब, बाहेर कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर नेऊन कुणीतरी टाकलं होतं.

मेघजी : (उत्साहाने) बघा, तरी मी आधीच सांगितलं होतं.

विठू : (त्याच्यावर चिडत) माणसं नाही जनावरं आहात तुम्ही. तुझ्यासारखा उलट्या काळजाचा माणूस तर आजपर्यंत बघितला नव्हता कधी. एखादवेळ तूच नेऊन टाकलं असशील तिथं... चल आई, चल चंद्रा, इथं एक मिनिटभरसुद्धा थांबायची इच्छा नाही माझी. ( भोसलेंच्या पुन्हा पाया पडत) साहेब तुम्ही अगदी देवासारखे धावून आलात बघा. नाहीतर आयुष्यभर नशिबाला दोष देत बसलो असतो आम्ही. तुमचे उपकार आयुष्यभर विसरणार नाय आम्ही. (सामान भरू लागतो)

चंद्रा : (भोसलेंना) साहेब, माझं तर कुणीतरी काळीजच बाहेर काढून नेल्यागत झालं होतं बघा, वाचा बसायची वेळ आली होती पण परमेश्वरानंच वाचवलं आम्हाला.

जना : लग्नानंतर बारा वर्ष झाली तरी मूल होत नव्हतं अन नवसा सायासानं झालं तर हा प्रकार... त्यात पुन्हा

आपरेशन हिचं... वितभर पोट फाडून ठेवलंय डॉक्टरांनी... आमच्या गावी मोलमजुरी करणाऱ्या बाया येळ आली तर झाडाखालीच बाळंत होतात. दवा नाय का डाक्टर नाय. आन हितं आनलं हिला, तर एवढं मोठं आपरेशन... बकरा कापावा तसं कापतात पेशंटला... देवा पांडुरंगा दुष्मनावरसुद्धा अशी वेळ येऊ देऊ नको रे कधी... (हात जोडून) फार उपकार झाले साहेब तुमचे...

भोसले : उपकार कसले त्यात, आमचं कर्तव्यच आहे ते! तुम्हाला बाळ मिळालं याचा आनंद तुमच्यापेक्षा जास्त आम्हाला आहे. आता अगदी बिनधास्त घरी जा आणि हो, बारशाला बोलवायला विसरू नका बरं का? (हसतात)

जना : असं कसं होईल साहेब अगदी नक्की बोलवू. विठू येईल निमंत्रण घेऊन (तिघेही जातात.)

भोसले : ( सिस्टरला कठोरपणे ) रात्रपाळीच्या संपूर्ण स्टाफला बोलावून घ्या ताबडतोब! फुकटचा पगार घेऊन माजलेत साले... बघतो एकेकाला चांगला... सरकारी हॉस्पिटल म्हणजे बापाचं घर नाय आपल्या, हवी तशी मजा मारायला... एखाद्या धर्मशाळेतसुद्धा इतकी अंदाधुंदी दिसणार नाय... बोलवा लवकर सगळ्यांना! (मेघजीला दमात घेत) आणि तू रे?

मेघजी : (हात जोडत ) माझा काय दोष साहेब?

भोसले : तुला दाखतो मी बरोबर! कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर बाळ नेऊन टाकायचं, म्हणजे आपोआप बेवारस सिद्ध होतं ते. मग कुणाचं लक्ष नाही असं पाहून उचलायचं त्याला आणि विकायचं बाहेर नेऊन... नाहीतर बक्षिसी मिळवायची... हरामखोर साले, काय रे... (सिस्टर फोन फिरवू लागते. भोसले मेघजीची कॉलर पकडून त्याला दमात घेत त्याची चौकशी करू लागतात. त्यांचे फक्त हातवारे दिसतात. मग हळूहळू अंधार.)

अंक पहिला / प्रवेश दुसरा

(स्थळ : विठोबाचं घर. अंधारातच लाऊड स्पीकरवर 'हलके हलके जोजवा बाळाचा पाळणा' हे किंवा अशाच प्रकारचे दुसरे एखादे गीत सुरू आहे. पडदा उघडतो. बारशाचा कार्यक्रम झालेला आहे. शेजाऱ्या-पाजाऱ्यांची गर्दी ओसरली आहे. पूर्ण प्रकाश. जनाबाई बाळाला मिळालेल्या झबल्या-टोपऱ्यांच्या घड्या करून ठेवत आहेत. चंद्रभागा चांगली नटलेली. नाकात नथ, अंबाड्यावर गजरा, काठ पदराची साडी... बाळ पाळण्यात झोपलेले.)

जना : विठ्ठला पांडुरंगा, तुझी कृपा बाबा... तुझ्यामुळंच हा सुखाचा दिवस बघायला मिळाला आज ... आता कधीही डोळे मिटले तरी हरकत नाही.

चंद्रा : डोळे कशापाय मिटता? ह्या डोळ्यानीच आता नातवाचं कोडकौतुक करायचं, पाऽऽऽ र अगदी नातसून घरात येईपतूर काय होत नाय तुमाला!

जना : तोंडात साखर पडो तुझ्या... बघितलंस का, आंगडी-टोपडी किती जमलीत ती? खणा- नारळांचापण ढीग झालाय नुसता.

चंद्रा : हो ना, शेजारी-पाजारी किती जमले होते... त्यात ती पेप्रातली बातमी. त्यामुळं आणखी गर्दी झाली.

जना : जन्माला आल्या आल्या एवढी प्रसिद्धी मिळाली म्हणून किती कौतुक करत होते लोक हो ना, आणि जो येईल तो उचलून नाचवत होता नुसता... दमून गेलं माझं बाळ अगदी.

चंद्रा : आता बाळ नाही म्हणायचं. निवृत्ती! काय?

जना : हो निवृत्ती. निवृत्ती घरात आल्यापासनं अगदी आभाळ ठेंगणं झालंय बघा... कुठं ठेवू आणि कुठं नको असं झालंय त्याला...

चंद्रा :  दमला असाल. थोडा चहा करू का तुमच्यासाठी? (निवृत्ती रडू लागतो.)

जना : अगबाई, उठला वाटतं... मी घेते त्याला, तू बघ चहाचं... (निवृत्तीला पाळण्यातून काढतात आणि खेळवू लागतात चंद्रा चहाचं आधण ठेवते.) आ... आ... आ... ओ... ओ... ओ... माझा सोनुला तो... माझा छकुला तो... माझा राघू तो... जन्माला आल्या आल्या पळून जात होतास काय रे चोरा? आधी तुझा आज्जा मला टाकून गेला आणि आता तू पण चालला होतास काय रे गुलामा? विठुला... तुझीच कृपा रे बाप्पा, नाहीतर एवढ्या मोठ्या मुंबईत कुठं सापडला असता रे माझा निवृत्ती ! (निवृत्ती आणखी मोठ्यानं रडू लागतो) अले... अले... अले... ओ... ओ...ओ... चंद्रे, अंग गरम झाल्यासारखं वाटतंय याचं... जरा मीठ-मोहऱ्या घेऊन ये आणि दृष्ट काढून टाक बघू !

चंद्रा : आणते सासूबाई.

जना : सिस्टरताई येणार होती ना बारशाला? दिसली नाही.

चंद्रा : गेल्या आठवड्यात येऊन बाळाचं रक्त घेऊन गेली तेवढंच... येतो नक्की असं म्हणाली होती... कशासाठी नेलं रक्त तिनं काय कळलं नाय.

जना : परदेशी डॉक्टर भडकले होते म्हणे तिच्यावर... त्यांना न विचारताच डिस्चार्ज दिला हॉस्पिटलातनं म्हणून बरंच बोलले तिला... आता त्यात तिचा दोष काय म्हणा, आपणच घाई केली घरी येण्याची... (काही क्षण शांतता)

चंद्रा : दवाखानातल्या त्या वासानं डोकं उठलं होतं. त्यात ती पोलिसांची भानगड, काय करणार मग तिथं थांबून?

जना : ते पण खरंच होतं म्हणा!

चंद्रा : त्यात आणखी तो दारुड्या वार्डबॉय आणि ती धापू. त्यांची नजर मला तर काय चांगली वाटत नव्हती...

(मीठ-मोहऱ्या निवृत्तीवरून ओवाळून टाकते)

जना : विठू येईल आता भजनी मंडळीला घेऊन, त्यांच्या चहासाठी दूध काढून ठेवलंयस ना वेगळं?

चंद्रा :  हो सासूबाई.

जना : घे (निवृत्तीला तिच्याकडे देतात. ती त्याला दूध पाजण्यासाठी पदराखाली घेते. जनाबाई चहा गाळून दोन कप घेऊन येतात. चहा घेता घेता त्या दोघींचे बोलणे सुरू.)

चंद्रा : सासूबाई ऽऽऽ

जना : काय ग ऽऽऽ

चंद्रा : नाही, हॉस्पिटलमधनं आल्यापासनं रोज सांगीन सांगीन असं म्हणत होते...

जना :  काय सांगायचं होतं?

चंद्रा : कसं सांगावं तेच कळंना, शिवाय आजुबाजूला सारखं कोणीतरी असायचं.

जना : अगं पण काय सांगायचं होतं? आता सांग की... कोण नाय आता हितं... बोल...

चंद्रा : हॉस्पिटलात मी पयल्यांदा बाळाला पाजायला घेतलं का नाय?

जना : बरं...

चंद्रा : तेव्हा मला आठवतं...

जना  : काय आठवतं?

चंद्रा : (गप्प)

जना : अगं काय आठवतं? बोल की पुढं...

चंद्रा : मी निरखून बघितलं तर बाळाच्या डाव्या मांडीवर तीळ...

जना : हात्तिच्या ! अगं मग त्यात नवल ते काय? जन्मखूण आहे ती. मी पण बघितला होता तो तीळ.

चंद्रा : जन्मखूण कशी काय?

जना : अगं, विठूच्या बापाच्यापण डाव्या मांडीवर तीळ होता बघ. चांगला ठसठशीत... अगदी अस्साच. पावट्याएवढा. मी म्हणाले नाय तुला की विठूचा बापच आलाय तुझ्या पोटाला म्हणून?

चंद्रा : ते नाय म्हणत मी–

जना : मग?

चंद्रा : घरी येऊन बघती तर तीळ याच्या उजव्या मांडीवर!

जना : डाव्या मांडीवरचा तीळ उजव्या मांडीवर? अगं काय बोलतीस काय?

चंद्रा : तेच मला काय कळत नाही.

जना : उगा काहीतरी चकवा पडल्यागत बोलू नको...

चंद्रा : आता मी काय खोटं बोलतीय का? हे बघा...

(पाजता पाजता पदर बाजूला करून बाळाची मांडी दाखवते)

जना : तीळ अगदी बरोबर हाय...

चंद्रा : तीळ बरोबर हाय, पण मांडी म्हणाल तर ही उजवी नाय का?

जना : हो उजवीच हाय ही.

चंद्रा : मग आता तुम्हीच म्हणालात ना की तो तीळ सासरेबुवांच्या डाव्या मांडीवर होता म्हणून?

जना : ( विचार करत) आता बोलले खरी मी पण मांडी डावी का उजवी ते काय नीट आठवत नाय आता. ते गेल्याला

चाळीस वर्ष झाली. काय काय लक्षात ऱ्हाईल मानसाच्या? आणि हे बघ, तीळ हाय ना, मग झालं! मांडी डावी का उजवी याच्याशी काय करायचंय!

चंद्रा : नाही मला जरा संशय आला म्हणून विचारलं...

जना : संशय काढून टाक डोक्यातनं.

चंद्रा : वजनपण जरा जास्तच वाटलं...

जना : वजन जास्ती वाटलं?

चंद्रा : म्हणजे हॉस्पिटलात बाळ हलकं पण इथं आल्यावर जड वाटलं...

जना : बाळाचं असंच असतं, बोलता बोलता वाढ व्हती त्याची.

चंद्रा : रूप पण जरा बदलल्यासारखं वाटलं...

जना : अगं लहान बाळ रोज बारा रूपं बदलतं... तू आवर आता उठ, नसत्या शंका काढत बसू नको. भजनी मंडळ येईलच आता...

चंद्रा : आणखी–

जना : काही सांगू नको आता, म्हणशील की दूध पिताना चावतोय निवृत्ती म्हणून...

चंद्रा : हो अगदी हेच सांगणार होते मी तुम्हाला.

जना : डोकं फिरलंय तुझं... सा म्हैन्याशिवाय दात येत न्हायीत बाळाला चल, चहा फराळाच्या तयारीला लाग. (विठू येतो)

विठू : काय चाललंय, सासू-सुनेचं?

जना : काही नाही तुझीच वाट बघत होतो.

विठू : पाठोपाठच येतो म्हणाले पांडुरंगबुवा. एक हजार रूपये बिदागी ठरवली.

जना : जरा कमी नाही करायची?

विठू : जाऊ दे गं आई, आता काय कमी हाय आपल्याला? निवृत्तीचा पायगुण असा निघाला की, गिऱ्हाईक वाढलं बघ... भाजीच शिल्लक राहात नाय गाळ्यावर. परवा साडेसात हजार रुपये दिले इस्माईलशेठला ... आता गम्मत बघ तू, सहा महिन्यात सगळं कर्ज फेडतो त्याचं, मग गाळ्याचे आपण मालक.

जना : अजून किती कर्ज बाकी हाय?

विठू : (हिशेब करत ) आता बघ, पंच्याहत्तर हजार रुपये घेतले होते ना?

जना :  हो बरोबर.

विठू : मग त्यातनं पहिला हप्ता दहा हजाराचा गेला, आत्ता साडेसात हजार दिले. म्हणजे साठ हजाराचं राहतंय अजून, पण काही काळजी नाही आता. तू आयुष्यभर कष्ट उपसलेस आमच्यासाठी. आता फक्त निवृत्तीला घेऊन गल्ल्यावर बसायचं आणि खणाखण पैसे मोजायचे, काय? (निवृत्तीला उचलून घेत) बघतोय बघ कसा ! ( मुके घेत ) माझा कोबीचा गड्डा तो, रताळं ते माझं लाडाचं... गाल बघा साहेबांचे टोमॅटोसारखे फुगलेले आणि ओठ बघा कसे तोंडल्यासारखे लालेलाल

चंद्रा : मुलाचं वर्णन करताय का भाजीच्या मळ्याचं? (सर्व हसतात. दारात विकास पंडित उभा, खांद्याला झोळी.)

पंडित : आंबिलेंचं घर हेच का?

विठू : हो बरोबर. कोण पाहिजे आपल्याला?

पंडित : विठोबा आंबिले आहेत का?

विठू : हो मीच तो. आपण कोण?

पंडित : माझं नाव पंडित! विकास पंडित. 'नवसत्ता' पेपरात रिपोर्टर म्हणून काम करतो मी.

विठू : हो... हो आलं लक्षात, आमचं बाळ हरवल्याची बातमी तुम्हीच दिली होती ना?

पंडित : (आत येत) अगदी बरोबर!

जना : अहो ती बातमी वाचून किती लोक येऊन चौकशी करून गेले विचारू नका... वाईवरनं भाजी येते आमची, तिकडनंपण चिठ्ठ्या आल्या. नातेवाईकांची... पत्रं आली... हिरो करून टाकलं तुमी माझ्या विठ्याला... बसा, अगदी चांगल्या मुहूर्तावर आलात तुम्ही.

पंडित : चांगल्या मुहूर्तावर म्हणजे?

जना : (पेढा देत) घ्या, आज बारसं होतं बाळाचं, निवृत्ती नाव ठेवलंय.

वा : छान आहे नाव, (पेढा खात) पण...

जना : पण काय?

पंडित : नाही, तुम्हाला कसं सांगावं कळत नाही–

विठू : काय कसं सांगावं?

पंडित : गेल्या पाच वर्षापासून एमजे हॉस्पिटलमधल्या भानगडींच्या बातम्या छापतोय मी. अनेक प्रकरणं लावून धरली मी तिथली यंत्रसामुग्री खरेदीतला भ्रष्टाचार शोधून काढला. ब्लड बँकेतलं रक्त परस्पर बाहेर विकत होते तेही प्रकरण काढलं, आणि आता–

विठू : आता काय?

पंडित : गेल्या दोन-तीन वर्षांपासनं बघतोय मी, मुलं गायब होण्याचं प्रमाण वाढतंच चाललंय तिथलं...

जना : असंल बाबा, पण पांडुरंगाची कृपा म्हणून माझा नातू परत मिळाला मला...

पंडित : स्पष्ट बोलतो म्हणून माफ करा, पण तुम्ही ज्याला तुमचा नातू समजताय तो तुमचा नातू नाही. (संगीत)

विठू : काय काय, हा मुलगा माझा नाय?

पंडित : हो, हा तुमचा मुलगा नाही.

विठू : काय नशापाणी करून आलात की वेड्यांच्या इस्पितळात जायची वाट चुकलात? एवढी शिकली सवरलेली माणसं तुम्ही का असं अडाण्यागत वागून आमच्या आनंदावर विरजण घालताय?

पंडित : पण माझं म्हणणं–

विठू : काय पण नाय नि बीण नाय आधी बाहेर व्हा!

चंद्रा : ते काय म्हणतात हे ऐकून घ्यायला काय हर–

विठू : ( तापत ) काय ऐकायचं त्यात, तू गप्प बैस!

पंडित : तुम्हाला वाईट वाटणं हे स्वाभाविक आहे. मला आधीच माहीत होतं ते! पण आमचा व्यवसाय असा आहे की, सत्य शोधून बाहेर काढल्याशिवाय आम्हाला मुक्तीच मिळत नाही. आणि या प्रकरणात जोवर त्या बाईला खडी फोडायला पाठवत नाही तोवर गप्प बसणार नाही आम्ही!

विठू : कोणती बाई, काय म्हणताय काय तुम्ही?

पंडित : दुसरी कोण? रूक्मिणी अय्यंगार... हॉस्पिटलची डीन. शहाणी समजते ती स्वतःला पण हॉस्पिटलचं ॲडमिनिस्ट्रेशन कसं चालवायचं याची काडीची अक्कल नाय तिला. परवा ऑपरेशन थिएटरमध्ये कुत्रं घुसलं. काय प्रकार आहे हा मला सांगा? हॉस्पिटल चालवण्याची लायकी आहे का यांची? तिच्या अकलेचे कसे धिंडवडे काढतो ते बघाच तुम्ही. नाडकर्णीसाहेबांनी पूर्ण स्वातंत्र्य दिलंय मला.

विठू : कोण नाडकर्णी? काय बोलताय तुमी? आणि आमचा काय संबंध त्यांच्याशी?

पंडित : संपादक आमचे. (झोळीतून पेपर काढून दाखवत) हे पहा, वाचा. सर्व प्रकरण तपशीलवार छापलंय आम्ही. वाचा वाचा...

विठू : (बातमी मोठ्याने वाचत) “विठोबा आंबिले या भाजी विक्रेत्याचे हरवलेले मूल परत मिळाल्याचे दाखवून त्याची फसवणूक करण्यात आली आहे. त्याला दिलेल्या मुलाची ‘डीएनए टेस्ट’ केली असता ते मूल आंबिले यांचे नाही असे सिद्ध झाले आहे. या प्रकरणातील गुंता दिवसेंदिवस वाढत चालला असून एमजे रूग्णालयातील सावळा गोंधळ पुन्हा एकदा लोकांच्या समोर आला आहे. या प्रकरणात आरोग्य मंत्र्यांनी जातीने लक्ष घालावे अशी मागणी लोकांनी केली आहे." (चिडत) साफ खोटं हाय हे. कशाला नसतं लचांड मागं लावताय आमच्या?

पंडित : काही लचांड नाही. उलट यामुळं फायदाच होणाराय तुमचा... अग्रलेखपण आलाय (दाखवत) वाचा! गेल्या पाच वर्षात किती मुलं हरवली. पुढं त्यांचं काय झालं सगळं छापलंय. एमजे हॉस्पिटलमध्ये तर पळापळ सुरू झालेय. प्रत्येकजण धावतोय मुलाच्या शोधासाठी. मी जाऊन बघून आलो तर परदेशी डॉक्टर आणि त्यांचा सगळा स्टाफ गायब झालाय. त्या दिवशी जी नर्स होती ड्युटीवर - शोभा दुखंडे नावाची, तिच्या सस्पेंशनची ऑर्डरसुद्धा

तयार झालीय...

विठू : पण हे मूल आमचं नाही हे कसं काय म्हणता तुमी?

पंडित : डीएनए टेस्टच्या पुराव्यामुळं बोलतोय मी.

विठू : कसली टेस्ट?

पंडित : डीएनए! ती केली नसती तर काहीच लक्षात आलं नसतं कुणाच्या...

जना : काय असतं ते, डेने म्हजी?

पंडित : (हसत) डेने नाही, डी-एन-ए-! माणसाची खरी ओळख पटवून देण्यासाठी उपयोग होतो तिचा. रक्ताचा एखादा थेंब, केस, नखं... काही जरी सापडलं तरी त्यातला डी. एन. ए. काढून तो त्याच्या नातेवाईकांच्या डीएनएशी पडताळून नातं सिद्ध केलं जातं.

विठू : या बाळाची टेस्ट तुमी कधी केली?

चंद्रा : गेल्या आठवड्यात सिस्टर बाळाचं ब्लड शँपल घेऊन गेली का नाय?

विठू :  हो बरोबर, आली होती.

पंडित : ते यासाठीच होतं.

विठू : पण तिनं सँपल नेलं हे तुम्हाला कसं काय कळलं? आणि तुम्ही ते आमच्या सँपलशी कधी ताडून बघितलं? तुम्हाला कशी ही सगळी माहिती?

पंडित : अहो, पत्रकारिता करायची म्हणजे या गोष्टी कराव्याच लागतात आम्हाला...

जना : अहो पण काय गरज हाय इतक्या भानगडी करण्याची? आई काय मुलाला वळखू शकत न्हाय का आपल्या?

पंडित : तुमच्या सुनेचं एवढं मोठं ऑपरेशन झालेलं. भुलीचं इंजेक्शन दिलेलं. ती स्वतःच धड नव्हती तर मुलाला कशी ओळखील आपल्या? आली जे भेटलं ते मूल घेऊन! तुम्ही हॉस्पिटलमधून बाळ घेऊन लगेच निघालात. ते दुसऱ्याचं असेल अशी शंकाही तुम्हाला आली नाही. डॉक्टर परदेशीसुद्धा अधिक खोलात गेले नाहीत. त्यांच्या दृष्टीनं 'सुंठीवाचून खोकला गेला, पण इथंच काहीतरी पाणी मुरतंय हे लक्षात आलं माझ्या. मग माझं काम सुरू झालं. चंद्रभागा जेव्हा तिथं बाळंतपणासाठी गेली तेव्हा तिचं ब्लड सँपल ऑलरेडी घेण्यात आलं होतं. परवा या बाळाचं सँपल मिळालं. या दोन्ही सँपलमधला डीएनए काढून त्याची पडताळणी केली आम्ही पण ती जुळत नाही म्हटल्यावर शास्त्रीयदृष्ट्या हे बाळं तुमचं नाही हे सिद्ध झालं आणि लावली पुन्हा बातमी.

विठू : काहीतरी भलतंच कुभांड रचतोयस तू. आता होतोस बाहेर का हाणू जोड्यानं?

पंडित : (काढता पाय घेत) हे बघा, मी स्पष्ट बोललो म्हणून मला माफ करा पण यात तुम्हाला त्रास देण्याचा माझा हेतू नव्हता. उलट तुम्हाला तुमचं खरं बाळ मिळवून देईपर्यंत लावून धरणार आहे मी हे प्रकरण...

विठू : अहो पण खऱ्या खोट्याचा प्रश्नच कुठं येतो इथं? आमचं बाळ आम्ही घेऊन आलो घरी, संपला विषय !

पंडित : असा कसा संपेल विषय? पोलिस केस झालीय हे विसरू नका. ( सारे अस्वस्थ ) पण घाबरू नका... वेळ आली तर आरोग्यमंत्र्यांना राजीनामा द्यायला लावीन पण तुम्हाला न्याय दिल्याशिवाय राहणार नाही मी! (जातो)

चंद्रा : (अस्वस्थ) तरी मला संशय होताच... देवा भगवंता काय आलं नशिबात हे, असा कसा चकवा पडला मला...

विठू : (चिडत) तू गप बस बघू आधी!

चंद्रा : (उद्रेकानं ) काय गप बसू ? सांगत नव्हती मी तुमाला आत्ताच? ( एकदम गळा काढत ) देवा भगवंताऽऽऽ ( ती चक्कर येऊन जमिनीवर पडते. विठोबा आणि जनाबाई धावपळ करून तिच्या तोंडावर पाणी मारून तिला सावध करण्याचा प्रयत्न करतात.)

विठू : चंद्रभागे उठ, शुद्धीवर ये, उठ चंद्रे, उठ...

जना : हे काय नवीनच बालंट आलं नशिबाला?

विठू : काही बालंट - बिलंट नाही. तो पंडित काहीतरी कारस्थान करतोय. कशाला विश्वास ठेवायचा त्याच्यावर? आणि ही याच्या मांडीवरची जन्मखूण दिसत नाही का तुला? ( तिच्या तोंडावर पाणी मारत) उठ चंद्रभागे उठ...

चंद्रा : (भानावर येऊन, गळा काढत ) तरी मला संशय होताच... डाव्या मांडीवरचा तीळ उजव्या मांडीवर जाईलच कसा सांगा की हो! (निवृत्ती रडू लागतो... ) पेप्रातली बातमी समजंल आता सर्वांना, सगळीकडं बदनामी व्हईल...

जना : चुलीत घाल तो पेपर, त्या बाळाला दुधाला घे आधी. भूक लागली असंल त्याला.

चंद्र : कसं दूध पाजू मी त्याला, तुम्हीच सांगा सासूबाई ऽऽऽ

जना : पाज त्याला आधी, नंतर करू काय ती शहानिशा...

विठू : हे बघ चंद्रे, तुला शंभर टक्के सांगतो मी, हा पंडित एक नंबरचा नालायक माणूस हाय. आपल्या संसारात विष कालवायला निघालाय तो. काही लक्ष देऊ नको त्याच्याकडं. बाळाला दुधाला घे सरळ! घे म्हणतोय ना ! (निवृत्ती अधिक मोठ्यानं रडू लागतो. चंद्रा थोड्या अनिच्छेनेच त्याला पदराखाली घेते आणि मग नंतर नकळत एका अनामिक ओढीनं आणि नैसर्गिक भावनेनं त्याला दूध पाजू लागते. जनाबाई आनंदित होतात. संगीत येते.)

जना : वासरू हंबरलं की गायीला आणि मूल रडू लागलं की बाईला पान्हा फुटल्याशिवाय राहतो का कधी? (विठूला) जा कामाला, गाडी आली असंल तर माल उतरून घे, निवृत्ती झोपला की येते मी गाळ्यावर...

(दारात डॉक्टर परदेशी उभे.)

डॉक्टर : ( दारातूनच ) विठोबा आंबिले इथंच राहतात ना?

विठू : हो, कोण, डॉक्टरसाहेब? (क्षणभर शांतता. त्यांना पेपर दाखवत) तो पंडित येऊन गेला आत्ताच. ही बातमी...

डॉक्टर : खरी आहे ती...

विठू : काय?

डॉक्टर : येस... आय ॲम व्हेरी सॉरी, जे झालं त्याबद्दल खूप वाईट वाटतंय, पण त्याला आमचा इलाज नव्हता!

विठू : चोराच्या उलट्या बोंबा!

डॉक्टर : दवाखान्यातनं मूल घरी घेऊन जाण्याची घाई केली नाही तुम्ही?

विठू : मग काय डुकरांनी आणि कुत्र्यांनी त्याचे लचके तोडीपर्यंत थांबायला हवं होतं?

डॉक्टर : तुम्हाला सांगितलं होतं की बाळ मिळेल, पण तुम्ही ऐकलं नाही आणि पुढचा सगळा गोंधळ झाला... थोडं थांबला असतात डिस्चार्ज मिळेपर्यंत तर काही बिघडलं असतं का? ही बातमी वाचून आरोग्यमंत्र्यांनी सकाळी सकाळी अय्यंगार बाईना दम दिला आणि बाईंनी आम्हाला! आमचं दुःख कळणार नाही तुम्हाला!

(शांतता)

डॉक्टर : मला एक सांगा, मेघजी आला होता का इथं?

विठू : कोण मेघजी?

डॉक्टर : वॉर्डबॉय आमचा...

विठू : नाही.

डॉक्टर : बरं, सिस्टर?

विठू : ती पण नाही, पण का?

डॉक्टर : नाही, तसं काही विशेष नाही... उगाच चोंबडेपणा करण्याची सवय आहे आमच्या लोकांना, म्हणून म्हटलं !

विठू : नेमकं काय म्हणायचंय तुम्हाला?

डॉक्टर : जे काही घडलं त्याबद्दल हवं असल्यास पुन्हा माफी मागतो तुमची... चूक झाली !

विठू : अहो पण तुमच्या या चुकीमुळं आमचं आयुष्य बरबाद होण्याची वेळ आलीय त्याचं काय?

डॉक्टर : सॉरी म्हटलं ना विठ्ठलराव?

डॉक्टर : घडतं जनाबाई कधी कधी जीवनात असं...

विठू : एखाद्याचं बाळ हरवणं ही गोष्ट इतकी साधी कशी वाटते तुम्हाला? कमी शिकलेली माणसं मूर्ख असतात त्यांना काही भावना नसतात असं वाटतं का तुमाला?

जना : आम्ही काय करावं असं म्हणणं हाय तुमचं?

डॉक्टर : आता एवढी कृपा करा आणि ( खिशातून एक कागद काढत ) या पेपरवर सही करून द्या.

विठू : काय आहे त्यावर? कसल्या पेपरवर सही करायला सांगताय?

डॉक्टर ह: (त्याच्या हातात देतो) वाचा तुम्हीच.

विठू : (मोठ्याने वाचत) “ लिहून देतो की मला माझं खरं बाळ मला सुखरूप मिळालं असून आता या प्रकरणी माझी

कोणतीही तक्रार नाही. या प्रकरणी एमजे हॉस्पिटल किंवा तेथील कोणतेही अधिकारी किंवा कर्मचारी यांचा काहीही दोष नाही - विठोबा आंबिले...” यावर मी सही करायची?

डॉक्टर : अगदी बरोबर. हा कागद पोलिसांना दिला की झालं!

विठू : पण तुमचा डीएनए रिपोर्ट म्हणतो त्याप्रमाणे हे बाळ आमचं नाही ना?

डॉक्टर : बरोबर.

विठू : मग खरं माझं बाळ मला मिळालंय, असं मी कसं काय लिहून देऊ?

डॉक्टर : (हसत) हा प्रश्न तुम्ही मला विचारणार याची कल्पना होतीच. ( दरवाजाजवळ जाऊन हाक मारत ) धापूबाई SSS ( धापू आत येते. निळ्या काठाची पांढरी साडी बेंबीखाली नेसलेली. केसाच्या झिपऱ्या तोंडात पानाचा तोबरा. तिच्या हातात दुपट्यात गुंडाळलेलं एक बाळ. विठोबा, जनाबाई आणि चंद्रभागा उठून उभे रहातात. तिघेही आश्चर्यचकित झालेले.) हे बघा, असं गोंधळून जाण्याचं काही कारण नाही. हे जे बाळ आणलंय ते तुमचं आहे याची खात्री बाळगा. घ्या! (चंद्रभागा 'माझं बाळ म्हणत धावत पुढं येते, विठोबा तिला 'थांब तिथच' म्हणत रोखून ठेवतो. सारे अचंबित झालेले डॉक्टर उलगडा करत पुढं बोलू लागतात.) पेपरात ती बातमी आली आणि सगळी यंत्रणा पुन्हा कामाला लागली आमची... नोकऱ्या जाणार हे जेव्हा लक्षात आलं तेव्हा सगळी कामं बाजूला ठेवून शोध सुरू झाला सगळ्यांचा...

:

डॉक्टर : सिस्टर तर सस्पेंडच झाली. पण नशिबानं अखेर सापडलं तुमचं बाळ... घ्या आणि सोडवा आम्हाला.

विठू : आमचं बाळ आहे हे? कुठं सापडलं ते तुम्हाला?

डॉक्टर : नाक दाबलं की तोंड उघडतं म्हणतात ते असं...

विठू : म्हणजे?

डॉक्टर : म्हणजे काय, सोळंकी आणि ही धापूसुद्धा सस्पेंड होणार होती पण लगेच धावपळ करून बरोब्बर शोधून काढलं त्यांनी... घ्या .

विठू : पण हे मूल आमचंच आहे याची खात्री कशी काय देऊ शकता तुम्ही?

डॉक्टर : डीएनए टेस्ट! (खिशातून कागद काढत ) हा बघा रिपोर्टपण आणालाय सोबत.

विठू : आम्हाला काय कळतंय डीएनए म्हणजे काय ते!

डॉक्टर : ( समजावून सांगत ) सी, इट्स व्हेरी सिंपल ... डीएनए इज द सिंगल मोस्ट इंपॉर्टंट मॉलेक्यूल इन लिव्हिंग सेल्स अँड कंटेन्स ऑल द इन्फॉर्मेशन दॅट डिटरमाइन्स हू यू आर ॲन्ड व्हॉट यू लूक लाईक... म्हणजे असं बघा, आपल्या शरीरातली एक पेशी घ्यायची. त्या पेशीतला क्रोमोझोम काढायचा, त्या क्रोमोझोममधला जीन काढायचा आणि त्या जीनमधला डीएनए बाहेर काढून तपासायचा. त्यावर आपण कुणाचे कोण हे चिन्हांच्या भाषेत लिहून ठेवलेलं असतं. आता तुम्ही म्हणाल हा डीएनए कसा काय ओळखायचा... तो कसा दिसतो? तर समजा आपण एक

बांबूची शिडी घेतली आणि तिला पीळ दिला तर जसं चित्रं दिसेल ना तसाच तो दिसतो. समजलं?

विठू : समजलं असतं तर मी डॉक्टर झालो नसतो मी?

डॉक्टर : आपल्या शरीरातला सर्व डीएनए काढून तो शिडीसारखा एकाला एक जोडत नेला तर त्याची लांबी किती होईल माहिताय का? पृथ्वीपासून चंद्रापर्यंत तेरा फेऱ्या करू शकतो आपण. किती? तेरा! (सर्वजण शांत). अजूनही काही समजलेलं दिसत नाही तुम्हाला. (पुन्हा समजावत चंद्रभागेला ) मला एक सांगा, तुम्ही जेव्हा पहिल्यांदा बाळ पाहिलं तेव्हा त्याच्या अंगावर काही जन्मखुणा आढळून आल्या का तुम्हाला?

चंद्र : (उत्साहानं) त्याच्या डाव्या मांडीवर चांगला हा अस्सा पावट्याएवढा तीळ होता...

डॉक्टर : (हसत) व्हेरी गूड, धापूबाई ऽऽऽ ( धापू मूल घेऊन पुढं येते) हे बघा, पहा... याच्या डाव्या मांडीवरचा तीळ... (सर्वजण धावत पुढं येऊन पहातात. चंद्रभागाची तर खात्रीच पटते आणि 'माझं लाडकं बाळ' ते असं म्हणत आवेगानं त्याला उचलून छातीशी लावते. संगीत.) काँग्रेच्युलेशन्स मिस्टर आंबिले, काँग्रेच्युलेशन्स. आज आम्ही आलो ते अगदी चांगल्या मुहुर्तावर. बारशाच्या दिवशीच तुमचं खरं मूल सापडावं हा एक चांगला योगच म्हणावा लागेल. शेवटी सत्याचा वाली परमेश्वर असतो हेच खरं... आता एवढी या कागदावर सही करा, ते पहिलं बाळ परत द्या आणि आम्हाला मोकळं करा...

विठू : काय चाललंय काय डॉक्टर तुमचं हे? 'हे बाळ घ्या आणि ते द्या' म्हणजे काय वांगी बदलून बटाटे घेताय का? भाजीपाला घेतानासुद्धा लोक दहादा विचार करतात.

डॉक्टर : ओके, ओके! आय कॅन अंडरस्टैंड युवर सेन्टीमेंट्स. मी वेळ देतो. तुम्ही सर्वांनी शांतपणे विचार करा. संध्याकाळी धापू येईल, हा तुमच्या सहीचा कागद आणि पहिलं बाळ परत घेऊन जाईल. ओके? ( डॉक्टर आणि धापू दुसऱ्या बाळाला जनाबाईंच्या हाती ठेवून निघून जातात. हे तिघेही गोंधळलेले. एवढ्यात ते बाळ एकदम रडू लागते.) (जनाबाई बाळाला घेऊन चंद्रभागेच्या दिशेनं निघतात.)

विठू : आई काय चाललंय तुझं हे?

जना : काय म्हणजे? ( मुलाला चंद्राकडे देते. चंद्रा एका अनामिक ओढीनं मुलाला उचलते आणि पदराखाली घेऊन पाजू लागते.)

जना : बाळाचा फैसला लागेपर्यंत याला कायतरी नाव ठेवावंच लागेल आपल्याला.

विठू : काय करावं ह्या कर्माला आता? विठ्ठल, परमेश्वरा का रे बाबा परीक्षा घ्यायाला निघालास आमची?

जना : त्यात कसली परीक्षा विठू?

विठू : उद्या लोक विचारतील तर काय सांगू त्यांना मी ?

जना : लोक?

विठू : खुशाल काही मागचा पुढचा विचार न करता या मुलाला घरात घेतलंस तू कसं तोंड दाखवू बाहेर? फिदीफिदी हसणार नाहीत ते?

जनि : लोकांचा काय संबंध इथं? त्यांना काय कळतंय खरं आणि खोटं ते?

विठू : काय म्हणायचय तुला?

जना : ऑपरेशन थेटरमधी आत काय चालतं कोणी बघितलंय का कधी? आतल्या आत एखाद्यानं मुलांची अदलाबदल केली तर कुणाला कळू शकतं का?

विठू : पण असं कशाला करील कोण! वेड लागलंय का तुला?

जना : मनात आलं तर माणूस काय बी करू शकतो.

विठू : कायतरी बोलू नको.

जना : आमची आई गोष्ट सांगायची. राजाची राणी बाळंत झाली तरी कारस्थानी माणसं ते पोर पळवून तिथं वरवंटा नायतर केरसुणी ठेवायची !

विठू : तुझी पुराणातली वांगी पुराणात ठेव.

जना : त्रास करून घेऊ नको तू सत्य येईल आपोआप बाहीर. या मुलाचं नाव काय ठेवायचं तेवढं सांग.

विठू : तूच ठेव काय ते (चमत्कारिकपणे रिॲक्ट होत) नायतर हा निवृत्ती तर हा ज्ञानदेव !

: वा, झकास जोडी जमली अगदी. निवृत्ती - ज्ञानदेव. बघ बघ कसा हसतोय तो... काय रे लबाडा... अले अले अले ... ओ ओ ओ, ( विठूला ) घे जरा निवृत्तीला. मी देवळात जाऊन येते खाली, पाय पण मोकळे होतील जरा... (देत) घे... (निवृत्तीला) त्रास देऊ नको बरं का बापाला ... अलेलेले ओ ओ ओ... (त्याची पापी घेतात)

चंद्रा : लवकर या सासुबाई! भजनी मंडळ येईल एवढ्यात. मला काय एकटीला झेपायचं नाय त्यांचंच...

जना : हो माहिताय मला, अशी गेले आन् आशी आले बघ!

( तुका म्हणे माझे, हेची सर्व सुख पाहीन श्रीमुख आवडीने... म्हणत म्हणत त्या जातात. विठू निवृत्तीला घेऊन स्टेजच्या मधोमध पुढे येतो आणि त्याच्याकडे निरखून पाहू लागतो)

विठू : चंद्रे SSS

चंद्रा : काय हो?

विठू : ज्ञान्याला घेऊन हिकडं ये जरा.

चंद्रा : ( पाजणं आटपून ज्ञान्याला घेऊन पुढं येते) काय वो, काय म्हणता?

विठू : (निवृत्तीकडे पहात) याचं नाक कसं दोरीसारखं सरळ हाय ना एकदम ?

चंद्रा : व्हय... अगदी तुमच्या नाकासारखं.

विठू : शाब्बास, आता कशी बोललीस ! मग ज्याचं नाक माझ्यासारखं ते बाळ आपलं!

चंद्रा : पण ह्या ज्ञान्याच्या हाताची बोटं बघा कशी लांबसडक हायेती ती!

विठू : (पाहात) खरंच की, अगदी हुबेहुब तुझ्या बोटांसारखीच हायीत!

चंद्रा : मग झालं तर, ज्याची बोटं लांबसडक ते बाळ आपलं!

विठू : आन ह्या निवृत्तीचं कपाळ बघ कसं भव्य हाय ते!

चंद्रा : ( पाहात) खरंच की आगदी तुमच्या कपाळावाणी हाय.

विठू : मग झालं तर ! हेच आपलं बाळ.

चंद्रा : आन् ह्या ज्ञान्याचे डोळे बघा कसे हायेत ते!

विठू : आगं खरंच की, आगदी तुझ्या डोळ्यांसारखे टपोरे आन् काळेभोर हायेती की! मग हेच बाळ आपलं!

चंद्रा : आणि ह्या निवृत्तीचा रंग? सांग बरं कसा हाय तो? माझ्यासारखा न्हाय का?

विठू : तो हाय तुमच्यासारखाच ! पण ह्या ज्ञान्याचा रंग कसा हाय सांगा बरं?

चंद्रा : तो हाय अगदी केवड्याच्या पानासारखा,

विठू : (तिचा गालगुच्चा घेत) अगदी तुझ्या सारखा.

चंद्रा : मग झालं तर, हा ज्ञान्याच आपला !

विठू : नाय हा निवृत्तीच आपला !

चंद्रा : नाय ज्ञान्याच !

विठू : आगं तू काय मला शिकवतीस? नुसती नजर टाकली तरी लासलगावचा कांदा कोणता आणि तळेगावचा बटाटा कोणता यातला फरक कळतो मला !

चंद्रा : अहो पण ही पोरं हायेती, जिती-जागती! काय कांदे बटाटे न्हायीत. हा ज्ञान्याच आपला ! मी नऊ महिने भार वाह्यलाय याचा पोटात.

विठू : ( तिला समजावून सांगत) हे बघ, निवृत्तीनाथ हे ज्ञानदेवांपेक्षा मोठे का न्हाय?

चंद्रा : (त्याचा डाव ओळखत) हो, पण ज्ञानेश्वर हे निवृत्तीनाथांपेक्षा ज्ञानानं मोठे का न्हाय?

विठू : पण ज्ञानदेवानी निवृत्तीनाथाना आपलं गुरू मानलं हे खोटं हाय का?

चंद्रा : तुमी आईच्या वळणावर गेलाय आपल्या ! बोलण्यात ऐकणार न्हाय कुणाला... (हट्टानं ) हा ज्ञान्याच आपला...

विठू : न्हाय निवृत्ती !

चंद्रा :  ज्ञानदेव !

विठू : निवृत्ती !

चंद्रा : ज्ञानदेव!

विठू : निवृत्ती !

विठू : अगं आता किती वेळ भांडशील? (बाहेर पाहात ) लोकांना फुकटचा तमाशा!

चंद्रा : मी कुठं, तुम्हीच भांडताय माझ्याशी!  सारखे वसावसा अंगावर येताय माझ्या... गोडी - गुलाबीनं बोलायचं तर इसरूनच गेलात तुमी !

विठू : ( तिचं नाक पकडत) अगं आई आसती घरात, शेजारी-पाजारी असतात.

चंद्रा : एवढं मोठं आपरेशन झालं पण कौतुकाचा शब्द काढला नाय तुम्ही तोंडातनं...

विठू : आता काय प्रत्येक गोष्ट बोलूनच दाखवायला पायजे का ?

चंद्रा : बघायला पण वेळ नाय मिळत?

विठू : आता कसं सांगू तुला ! त्या पोराला ठिव आन् ये हिकडं!

चंद्रा : ( ती मुलाला पाळण्यात घालते. तो दुसऱ्या मुलाला बाकड्यावर निजवतो. त्याच्याजवळ येते ) काय म्हणता?

विठू : आसं वाटतं चंद्रे, तुला जवळ घ्यावं आणि नुसतं तुझ्या डोळ्यात बघत बसावं.

चंद्रा : डोळे येतील अशानं !

विठू : (अपेक्षाभंगानं) जमीनीवरचे पाय काय कधी सुटायचे नाहीत तुझे.

चंद्रा : मी जमीनीवर आसती म्हणून चालतंय घर तुमचं. नायतर गेली असती एखादी पळून एवढ्यात. मग बसला असता हरि हरि करत!

विठू : हा तुझा झटका मात्र अगदी लवंगी मिरची सारखा हाय बघ चंद्रे!

चंद्र : जावा तिकडं...

विठू :  बाळंतपणानंतर तुझं सौंदर्य आसं खुलून निघालंय की वाटतं, सारखं बघत बसावं तुझ्याकडं.

चंद्र : याड लागलय तुमाला!

विठू : चौदवी का चाँद!

चंद्र : चला कायतरीच!

विठू : अग, कायतरीच काय त्यात! केळ निसवली की खुलून दिसती का न्हाय सांग बरं, कळ्यानी लगडलेली मोगऱ्याची वेल धुंद करून टाकती का न्हाय सांग बरं, पोटरीवर आल्याला ज्वारीचा मळा बघून मन हारखून जातं का

न्हाय सांग बरं, गाभुळलेली चिंच बघून नुसती बघूनच, सगळं अंग तृप्तीनं भरून जातं का न्हाय सांग बरं... तसंच वाटतंय तुझ्याकडं बघून. ( तिला ओढून मिठीत घेतो, ती संकोचानं आणि कौतुकानं भांबावून गेलेली. 'अहो, अहो, अहो, बघल कोणी, सासुबाई येतील सोडा...' असं म्हणून स्वतःला सोडवून घेऊ पाहते. तो सोडत नाही. 'एका बाळंतपणात ही कथा तर पुढं काय होईल; पांडुरंगाला माहीत. नको बाबा ती भानगड' असं म्हणत ती त्याला विरोध करते. इतक्यात पाळण्यातलं मूल जोरात रडू लागतं त्यामुळे त्याला तिला सोडावं लागतं)

विठू : (वैतागून) काय टायमात रडतंय तिच्यायला... अगदी शंभरपैकी शंभर मार्क द्यावे! (पाळण्यातनं मुलाला बाहेर काढून त्याला जाब विचारू लागतो) काय रे बोंडुकल्या, कुठं रडायचं हे तुला आगदी चांगलं कळतं मग तुझा पत्ता सांग की जरा! कुठनं आलास तू, अन् नेमका हितंच कसा आलास? तू भायखळ्याचा, शिवडीचा, मशीदबंदरचा का वसईचा? बोल की! मग घेऊन जातो तुला आन् करतो तुझं पार्सल तुझ्या आय-बापाकडं परत! बोल की रे सुक्काळीच्या!

चंद्रा : अहो, कशापाय कावताय एवढं? त्याला काय कळतंय त्यातलं!

विठू : कोण कुठलं टाकून दिलेलं पोर. आईचा पत्त्या न्हाय का बापाचा न्हाय. असल्या आय-बापाला फासावरच चढवायल हवं... (मुलाला ) ही काय धर्मशाळा वाटली का काय तुला? का अनाथालय? अनाथालयातसुद्धा पैसे मोजायला लागतात हल्ली खणाखण! तुला जर चाड आसंल तुझ्या खानदानाची तर सांगशील मला पत्ता! (राग आणि प्रेम या दोन्हीच्या कैचित तो सापडलेला. मुलाला छातीशी धरून सहज म्हणून उंबरठ्याच्या बाहेर जातो आणि अचंबित होऊन लगेच आत येत) चंद्रेऽऽऽ

चंद्र : काय वो !

विठू : अगं बाहीर बघितलसं का?

चंद्र : काय ते !

विठू : अगं सगळी गॅलरी फुल्ल झालीय.

चंद्रा : म्हणजे वो?

चंद्रा : (रडवेली होत) सगळेजण जमून बघायलेत आपल्याच घराकडं !

( खात्री करून घेण्यासाठी दुसऱ्या बाळाला छातीशी घेऊन ती पण बाहेर जाते आणि तशीच पळतपळत आत येते)

विठू : बघितलंस?

चंद्र : सगळे हसतायत आपल्याकडं बघून. कसं जगावं तेच कळंना गेलंय.

विठू : ( दरवाजात जाऊन बाहेर पाहात ओरडत) काय रे कशाला गर्दी केलीय एवढी ! काय तमाशा चाललाय का इथं? का नागडं नाचतंय कोण? तुम्ही तुमची मुलं सांभाळा म्हजी झालं, आम्ही बघू अमचं काय करायचं ते ! (चंद्रा त्याला ओढून आत आणू पाहते. त्यानं त्याला अधिकच जोर येतो) अरे पाजल ती दूध दोन पोराना... दोन का धा पोरांना पाजल, तुमच्या बापाचं काय जातंय? (चंद्रा त्याला आत आणते आणि 'शांत व्हा, शांत व्हा' म्हणू लागते. ' चॅयला समजतात काय स्वतःला ' असं म्हणत विठू बाळाला थोपटू लागतो. जनाबाई येतात. 'घे प्रसाद' म्हणत विठूला, चंद्राला साखरफुटाणे देतात. हाता-पायावर पाणी घेऊन एका बाळाला उचलून घेतात. घरातील तणाव

त्यांच्या लक्षात येतो. दोघांना–)

जना : तुमची तोंडं का अशी उतरलेली? काय झालं?

विठू : शेजारी-पाजाऱ्यांनी जगणं कठीण करुन टाकलंय अगदी.

जना : आलं लक्षात ! माझ्याकडंपण रोखून रोखून बघत होते समदेजण! पण जाऊद्या... लोकांचं असंच असतं. ते पायीपण चालून देत नाहीत आणि घोड्यावर पण बसून देत नाहीत.. ठेविले अनंते तैसेचि राहावे...

विठू : नाही मी काय म्हणतो, आपलं आपण निस्तरतोय ना, मग ह्यांनी का उगाच खाजवून खरूज काढायची?

जना : बोलतील दोन दिवस आणि बसतील गप, तू शांत हो.

विठू : काय शांत होऊ? दिवसेंदिवस वाढतच चाललंय सगळ्यांचं... किती सहन करणार? (त्याचा एकदम उद्रेक होतो. एखाद्या न्यूज चॅनलच्या अँकरचं बेअरिंग घेत चीड व्यक्त करू लागतो–) आईये देखते हैं एक अजूबी कहानी... विठोबा आंबिले के बच्चे का क्या हुआ? एक बच्चे का अपने मा से बिछड़ जाना क्या होता है? मुंबई के एमजे अस्पताल मे हुई बच्चों की अदला- बदल, डॉक्टरने कहा डीएनए रिपोर्टसे लगेगा सही बच्चे का पता. क्या होता है ये डीएनए? आईए करते हैं बातचीत हमारे विशेषग्योंसे... मगर उससे पहले लेते हैं एक छोटासा ब्रेक ! (चिडून पेटीवर बसतो. काही क्षण तणाव. दारात मेघजी सोळंकी उभा. नेहमीप्रमाणे दारूच्या नशेत!)

मेघजी : विठोबा आंबिले इथंच रहातात का?

जना : कोण? (बाहेर पहात) अगंबाई, हा तर वॉर्डबॉय. काय नाव याचं, विसरले मी!

मेघजी : मेघजी... मेघजी सोळंकी.

जना : हां आठवलं.

मेघजी : ( आत येतो. त्याच्या हातात कापडात गुंडळलेलं आणखी एक बाळ. तो जनाबाईना ) पाठीवर मारा पण पोटावर मारू नका जनाबाई...

जना : म्हणजे?

मेघजी : पेपरात ती बातमी आली ना, तवापासून ग्रहदशा फिरली माझी. डॉक्टरांनी हॉस्पिटलात बोलवून घेतलं आन सस्पेंड करतो म्हणाले.

जना : पण कशासाठी?

मेघजी : चाळीस वर्ष नोकरी झाली माझी. आता सस्पेंड झालो तर आमची सगळी फॅमिली रस्त्यावर येईल. आय-बाप म्हातारे हायीत. बाप पांगळा हाय. हाल कुत्रं खाणार नाय आमचे, माझी नोकरी गेली तर. तुम्ही वाचवा आम्हाला, जनाबाई वाचवा!

जना : अरं पण म्हजी काय करू?

मेघजी : हे बाळ आणलंय तुमचं ते घ्या... आणि डॉक्टरांना फोन करून सांगा की बाळ मिळालं!

जना : बाळ मिळालं?

मेथी : त्या दिवशी तुम्हाला जे बाळ त्या कडू हवालदारानं आणून दिलं ते तुमचं नव्हतं. तुमचं खरं बाळ हे हाय!

विठू : अरे काय बडबडतोयस तू? शुद्धीवर आहेस का?

मेघजी : डॉक्टरांनी सस्पेंड करायची धमकी दिली तेव्हा शुद्धच हरपली होती माझी पर जवा हे बाळ मिळालं तवा शुद्धीवर आलो मी परत. हे घ्या ताब्यात आणि मला गरीबाला सोडा यातनं.

विठू : अरे पण तू हे बाळ आणलंस कुठनं?

मेघजी : तेवढं विचारू नका सायेब...

विठू : म्हणजे नोकरी जाऊ नये म्हणून तुला जे दिसलं ते बाळ उचलून आणलंस तू? कुणाचं हाय हे बाळ? कुठनं आणलंस?

मेघजी : (चूक उमगून तोंडात मारून घेत) नाय नाय, तसं अज्याबात नाय. तुमचंच हाय हे; तुमचंच हाय!

विठू : तू खात्री कशी काय देऊ शकतोस की हे आमचंच आहे म्हणून?

मेघजी : (पश्चातापाने जनाबाईंना) त्या दिवशी तुम्ही सकाळी तोंड धुवायला गेलात आन् ( चंद्राकडे निर्देश करत) ह्यांचा डोळा लागला का नाय, तवा मी याला पाळण्यातनं उचललं आन सरळ बाहेर पडलो. जाता जाता नजर टाकली ह्याच्या मांडीवरचा तीळ नीट ध्यानात आला माझ्या. (चंद्रा अवाक झालेली. स्वतः च्या थोबाडीत मारून घेत आहे.) त्या तिळावरनं सापडलं बाळ तुमचं. म्या पापी हाय... मला माफ करा पण एवढं बाळ घ्या तुमचं न् मला मोकळं करा...

चंद्रा : म्हणजे याच्यापण मांडीवर तीळ आहे?

मेघजी : तुमीच बघा की सोताच्या डोळ्यांनी.

विठू : ( चंद्रभागेला आणि जनाबाईना) काय तुम्ही ती नाय ती भानगड काढली तिळांची? कुठं होता नेमका तीळ? डाव्या मांडीवर होता का उजव्या?

चंद्रा : मी डाव्या मांडीवर बघितला होता आणि सासूबाई म्हणतात की उजव्या मांडीवर होता...

जना : (चिडत) आता मी काय फोटो काढून ठेवला व्हता का त्याचा? चाळीस वर्ष झाली त्यांना जाऊन. तुम्ही दोघीही जरा गप बसाल का? (मेघजीला) हे बाळ घेऊन कुठं गेला होतास तू? आणि इतके दिवस कुठं होतं ते?

मेघजी : (तोंडात फाडफाड मारून घेत) श्यान खान्याची बुद्धी झाली सायेब... आता जास्त खोलात शिरु नका. हवं तर जोडे डोक्यावर घेतो तुमचे पण नाय म्हणून नका, घ्या हे बाळ तुमचं...घ्या!

विठू : ( चिडत ) तू मला एवढं सांग की या बाळाला कुठनं आणलंस तू? त्या पंडितनं लिहिलय प्रेप्रात ते खरं हाय का? मुलं पळवणाऱ्या टोळीत सामील आहात का तुम्ही?

मेघजी : सांगितलं ना साहेब श्यान खायची बुद्धी झाली... दारुच्या नशेत होतो मी... मला काय पण आठवत नाय

साहेब... हे बाळ घ्या आन गरीबाची सुटका करा.

विठू : अशी कशी सुटका करू तुझी? लोक काय म्हणतील?

मेघजी : लोकांची काळजी करू नका साहेब. आता ही भानगड उघडकीस आली म्हणून, नायतर काय कळतंय कुणाला? राधेचा क्रिष्ण यशोदेच्या घरात वाढला नाय का, तसं समजायचं आपण ! (पश्चात्तापाने) दारुच्या नशेत आजवर किती पोरांची अदलाबदल केली असंल मी ती फक्त त्या देवालाच माहीत. घ्या! ( बाळाला त्याच्या हातात ठेवून त्याला साष्टांग दंडवत घालून झटकन निघून जातो. विठू स्तंभित झालेला. तो मुलाला इकडून तिकडून नीट निरखून पाहू लागतो. पाहाता पाहाता त्याच्या चेहेऱ्यावर आश्चर्याचे भाव दिसू लागतात.)

चंद्रा : हाय ना मांडीवर तीळ?

विठू : (शॉकमध्ये असल्याप्रमाणं) हाय ना, हाय! अगदी ठसठशीत. पावट्याएवढा...

चंद्रा : कोणत्या मांडीवर हाय?

विठू : त्येच बघत होतो. खात्री करून घेण्यासाठी–

चंद्रा : कोणत्या मांडीवर हाय?

विठू : दोन्ही मांड्यांवर!

जना/चंद्रा :  दोन्ही मांड्यांवर? (असं ओरडत बाळाला पाहायला धावतात.)

विठू : मग मी काय खोटं बोलतोय का... बघा... बघा... (दोघीही पाहातात. “अगं बाई खरंच की" "पण दोन्ही मांड्यावर तीळ कसा येईल?" यासारखं आश्चर्य व्यक्त करू लागतात. )

विठू :  आई मी तुला सांगतो, ही तिळाची भानगड डोक्यातनं काढून टाक, नाहीतर जगातली किमान अर्धी  मुलं तरी घरात घ्यावी लागतील आपल्याला...

जना : गप बस. काय तरी चावट बोलू नकोस.

विठू : अरारररा! आधीच उल्हास त्यात फाल्गुन मास... चंद्रे, यानं पँट ओली केली माझी. जरा लंगोटी बदल याची...

चंद्रा : आणा हिकडं! (त्याची लंगोटी सोडत असताना एकदम किंचाळते)

विठू : काय झालं चंद्रे?

चंद्रा : (निरखून पहात) अहो हे बघितलं का?

दोघेही : काय, काय?

चंद्रा : मुलगी हाय ही!

जना : आग बाय, मुलगी?

विठू : (वेड लागल्याप्रमाणं) फार चांगलं झालं! अगदी योग्य मुहुर्तावर आली घरात. (जनाबाईंना) आता तिचं पण

नाव ठरवून टाकू म्हणजे झालं...

जना : मुलं म्हणजे देवाघरची फुलं इठ्या!

विठू : हो, पण ही फुलं आता जगू देईनात, गळ्याला नख लावायला निघालीत माझ्या.. (बाहेर जायला निघत ) पहिल्यांदा पोलिसात जाऊन कंप्लेंट करून येतो नाहीतर आणखी काही तरी भानगड मार्ग लागायची.

जना : कशाला उगा डोक्यात राख घालून घेतो? माझं म्हातारीचं ऐक तू. ज्याचं कुणाचं असंल बाळ तो येऊन घेऊन जाईल. पोलिसात गेलास तर, पोलिसाची जात माहीत हाय तुला, ते आधी तुलाच दोषी धरतील. आत पण टाकतील एखादवेळ!

विठू : (बाहेर जाण्याचा विचार बदलीत) ते पण खरं हाय तुझं ! पण करू तरी काय मग मी? डोकं फिरायची वेळ आलीय अगदी!

जना : ठेविले अनंते तैसेची राहावे, चित्ती असो द्यावे समाधान!  हा निवृत्ती, हा ज्ञान्या अन् ही मुक्ताबाई... झकास काम झालं अगदी! कधी नाय तो संतांचा मेळावाच जमला घरात. (विठूला) कुठाय तुझी ती भजनी मंडळी? करा म्हणावं सुरू भजनाचा कार्यक्रम... (बाहेर टाळ मृदंगाचा गजर. भजन ऐकू येऊ लागते. त्याचा आवाज वाढत जातो. हळू हळू अंधार. पडदा.)

**मध्यंतर.**

***

(या नाटकाची पूर्ण संहिता ज्यांना हवी असेल त्यांनी संकेतस्थळी दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. नाटकाचे भाषांतर, रूपांतर किंवा त्यावर आधारित दूरदर्शन मालिका, चित्रपट, टेलिफिल्म किंवा त्याच्या तत्सम अन्य माध्यमातील परिवर्तनासाठी लेखकाची परवानगी घेणे आवश्यक आहे. हे नाटक किंवा त्यातील कोणताही भाग, कोणत्याही मुद्रित वा इलेक्ट्रॉनिक्स माध्यमात वापरावयाचा असल्यास लेखकाची पूर्वपरवानगी घेण्यात यावी.)

***